# प्रेसनोट

## गुन्हे शाखा, युनिट-३, पिंपरी-चिंचवड पथकाकडुन एका इसमास अटक करुन ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे जप्त

मा.पोलीस आयुक्त श्री.कृष्ण प्रकाश सो. यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहीजे आरोपी, फरारी आरोपी, तडीपार आरोपी व गंभिर गुन्हे करणाया गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन, त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन वचक निर्माण करणेबाबत सुचना व मौखीक आदेश दिले आहेत. त्या आदेशाचे अनुषंघाने दि. ०९/०१/२०२१ रोजी गुन्हे शाखा, युनिट ३ पिंपरी चिंचवड चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबर यांचे अधिपत्याखालील पोलीस उप निरीक्षक गिरीश चामले तसेच स.पो.फौ. पठाण, पो.हवा. ७५५ आढारी, पोना ४७९ सानप, पोना ४८० चव्हाण, पोना १६६६ भालचिम पोशि १२८१ कोळेकर, पोशि १३०२ केकाण, पोशि २२९६ जैनक व पोशि २३९९ बाळसराफ असे रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहीजे आरोपी, फरारी आरोपी, तडीपार आरोपी यांची माहीती घेत पेट्रोलींग करीत फिरत असताना चाकण पोलीस ठाण्याचे हददीत तळेगावचौक, चाकण, ता. खेड जि. पुणे येथे आले असता पोना सानप यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "महेश पडवळ नावाचा इसम त्याचेकडे एक गावठी पिस्तुल असुन तो चाकण मार्केट येथे जाणार आहे, त्याने अंगात पांढरे रंगाचा शर्ट व काळे रंगाची पॅन्ट परीधान केलेली असुन तोंडावर फिकट निळया रंगाचा युज ॲन्ड थ्रो मास्क लावलेला आहे" अशी खात्रीशिर बातमी मिळाली असता सदरची बातमी ही वरीष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबर यांना कळविली असता,त्यांनी दिलेल्या सुचना मार्गदर्शनाखाली आंबेठाण चौक, चाकण, पुणे येथे सापळा लावला असता काही वेळातच आंबेठाण गावचे दिशेकडुन मिळालेल्या बातमीतील वर्णनाप्रमाणेचा इसम पायी येत असताना दिसला. तो इसम हा बातमीतीलच इसम असलेची खात्री झाल्याने सर्व पथकाने त्यास १६.१५ वा. पकडुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव महेश बाळु पडवळ, वय- २० वर्षे, रा. मु.बोरदरा, पो. आंबेठाण, ता.खेड जि.पुणे असे असल्याचे सांगितले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे कि.रु. ५१,००० ची असा माल मिळुन आलेने त्याचे विरोधात चाकण पोलीस ठाणे येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३,५(२५) तसेच सह कलम महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त श्री. सुधिर हिरेमठ सो, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर.आर.पाटील सो यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस निरीक्षक शंकर बाबर, पोलीस उप निरीक्षक गिरीश चामले तसेच स.पो.फौ.हजरत पठाण, पो.हवा.यदु आढारी, पो.ना. विठठल सानप, गंगाधर चव्हाण, महेश

भालचिम पो.शि. योगेश्वर कोळेकर, नाथा केकाण, सागर जैनक व त्रिनयन बाळसराफ यांचे पथकाने केली आहे.

